ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : भावफुलें

संपादक : बाळकृष्ण श्रीपाद दंडगे

प्रकाशक : बाळकृष्ण श्रीपाद दंडगे, चिकोडी

प्रकाशन वर्ष : १९३९

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रूपांतर - २०२४

# भावफुलें



861
Dam
4349

# भावफुलें

संपादक

बाळकृष्ण श्रीपाद दंडगे
( भारत प्रकाशन मंदीर, चिकोडी. )

आवृत्ति १ ली ]  किंमत ८ आणे  [ आक्टोबर १९३९

प्रकाशकः—
बाळकृष्ण श्रीपाद दंडगे,
भारत प्रकाशन मंदीर, चिकोडी.

मुद्रकः—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे, हनुमान प्रेस,
३०० सदाशिव पेठ, पुणें २.

# प्रस्तावना

माझे मित्र रा. दंडगे यांनीं आपण प्रसिद्ध केलेल्या चिमुकल्या कविता-संग्रहास प्रस्तावना लिहिण्याविषयीं मला फार आग्रह केल्यावरून मी पुढील चार शब्द लिहीत आहे. हा संग्रह प्रसिद्ध करण्यांत रा. दंडगे यांनीं फारशी हिशेबी दृष्टी न ठेवितां केवळ हौसेखातर हें काम केलें आहे हें विशेष होय. गुलाब-मोगऱ्यासारखीं कांहीं फुलें आपल्या निवासस्थानीं रसिकांना खेचून आणतील तर शेवंती-कोरांटीसारखीं कांहीं फुलें हार-तुऱ्यांत घालून रसिकांच्या हातीं मुद्दाम नेऊन द्यावीं लागतील. हें खरें, पण ज्या प्रसंगानें किंवा उद्देशानें तीं आपल्या हातीं देण्यांत आलीं तो प्रसंग किंवा उद्देश लक्ष्यांत घेऊन रसिक जनही त्यांच्या सुगंध-रूपांची विशेष छाननी न करितां त्यांचा सकौतुक आदर करतील हेंही तितकेंच खरें आहे, आणि हाच न्याय प्रस्तुत कविता-संग्रहास लागू आहे.

पण समाधानाची गोष्ट अशी आहे कीं, प्रस्तुत कविता-पुष्प संग्रहास गुलाबमोगरे म्हणण्याजोगीं फुलेंही थोडींबहुत आहेतच. आतां त्याना बिलगून राहिलेले ' त्रय-भुवन, ' ' भीकर ' मगदुरानुरूप, ' असले कांटे क्वचित् वाचकांना बोंचतील, पण तेवढयाकरितां हातांतला गुच्छच ऐनजिनशीं भिरकावून देण्यास कोणीं प्रवृत्त होईलसें वाटत नाहीं. आज-कालच्या कविपंक्तींत मानाच्या पानावर थाटानें विराजमान होणारे श्री. यशवन्त हेही या बालगोपालांच्या काल्यांत सामील झाले आहेत ही गोष्ट श्री. यशवंतांच्या शालीनतेला जितकी उठावदार आहे तितकीच इतर कवि-रसिकांना सूचकही आहे असें मनांत आल्यावांचून रहात नाहीं.

साधुदास, सांगली.

# संपादकाचें हृद्गत !

माझ्या अपेक्षेप्रमाणें सर्व गोष्टी न जुळून आल्यामुळें "प्रतिभा प्रकाश" ऐवजीं या भावफुलांनाच रसिकापुढें ठेवीत आहे. माझ्या विनंतिस मान देऊन सांगलीचे सुविख्यात कवि व प्रसिद्ध कादंबरीकार श्री. 'साधुदास' (गो. गो. मुजुमदार) यांनीं वेळांत वेळ काढून मार्मिक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल व गुरुवर्य विठ्ठल रघुनाथ पोतदार, आर्टिस्ट सदलगा यांनीं शारदेचें सुंदर चित्र काढून देऊन मुखपृष्ठाची शोभा दुणावल्याबद्दल आणि माझे मित्र श्री० वा. गो. चिंचणीकर यांनीं प्रुफ करेक्शनचे कामीं मदत केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केल्याविना राहवत नाहीं. तसेंच पुणें येथील प्रसिद्ध कवि 'यशवन्त' व संग्रहांतील इतर नवेजुने कवि यांनीं आपआपल्या परी सहाय्य करून हा लहानसा संग्रह काढण्यास सहकार्य केल्याबद्दल त्यांचेही आभार मानणें हें माझें कर्तव्यच आहे. शेवटीं पुणें येथील हनुमान प्रेसचे मालक ल० भा० कोकाटे यांनीं पुस्तक शक्य तितक्या जलदीनें व सुबकपणें छापून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानून हीं भावफुलें रसिकांच्या स्वाधीन करतों.

बाळकृष्ण श्रीपाद दंडगे.
(डी. बाळकृष्ण)

# भावफुलें

×

×

×


## समर्पण

भली बुरीही भाव फुलांची
ओंजळ रसिकावीण कुणाची ?
तशिच शारदे तवचरणीची
वद आस तयाना काय नसे ? ॥ १ ॥
म्हणुन शारदे तुज–रसिकाना
भाव फुलांचा हा नजराणा
अर्पण करितो निरखा–याना–
हृदय समरसीं जग डोलतसे ॥ २ ॥


— संपादक, डी. बाळकृष्ण

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | शारदावंदन .... | | १ |
| २ | आस ... ... | | ३ |
| ३ | गर्वहरण ... | | ४ |
| ४ | विकासोन्मुख तूं प्रभात–प्रसून | | ५ |
| ५ | हास्यमाधुरी ... | | ७ |
| ६ | आगगाडीस ... | | ८ |
| ७ | पारिजातकाचें फूल... | | १० |
| ८ | मरणमैत्री ... | | ११ |
| ९ | स्वर्गी भेट घडेल ... | | १२ |
| १० | गूढ ! ... | | १४ |
| ११ | श्रीकृष्णा ... | | १५ |
| १२ | झुंज ... ... | | १७ |
| १३ | प्रेमसमाधि ... | | २० |
| १४ | तान्ह्या मुलास पाहून | | २२ |
| १५ | भारताचें उज्ज्वल भविष्य ! | | २४ |
| १६ | चिमण्या फुलपांखरास | | २७ |
| १७ | बालक आणि बालपण | | २८ |
| १८ | न्याय ! ... | | २९ |
| १९ | इशारा ! ... | | ३२ |
| २० | छळणूक ... | | ३३ |
| २१ | भेट ... ... | | ३४ |
| २२ | सुप्रभात ... | | ३५ |
| २३ | जीविताचें गणित ... | | ३६ |
| २४ | अपेक्षा ... | | ३७ |
| २५ | माझी स्थिति ! ... | | ३८ |
| २६ | जीवन वसंत ... | | ३९ |
| २७ | भाषण ... | | ४० |
| २८ | एक स्वप्न ... | | ४१ |
| २९ | चैतन्य ... | | ४३ |
| ३० | लोकोपकार ! .... | | ४४ |
| ३१ | प्रेम आशा .... | | ४६ |
| ३२ | जगतापार .... | | ४७ |



कुमार- जे. बी. कोकितकर, बेळगांव.



सी. रा. बोरशे शिक्षक, ( शेंदुर्णी पू. खा. )





गं. दा. सगरी, शिक्षक,
निपाणी.

बालकराम लक्ष्मण शेले,
नांदेड ( हैद्राबाद )



रामचंद्र गोपाळराव वडेर, ( ' सुदर्शन ' चिकोडी, )

# भावफुलें

## शारदा वन्दन

करि नमन शारदे तव चरणीं
विशाल नभ हें भाल मनोहर
तिलक शांत शुभ विलसे विधुवर
सहज विकसले अष्ट दिशाकर
ही वसुंधरा तव देह धरी ॥ १ ॥

अवकाशीं तव वदन हांसरे
ज्ञान पवन तेथून संचरे
चरण युगल पाताल नावरे
तव अनंतता ये नच नयनीं ॥ २ ॥

अणू अणू तव ज्ञान तरारे
सकल कलांचा विकास विहरे
मनुज मती पाहून थरारे
रोमांच दाटती क्षणीं क्षणीं ॥ ३ ॥

देहीं तुझिया मानव पामर
अपार दिसतो लोभ तयावर
अभय तयाचें शिरीं ज्ञानकर
म्हणुन मिरवितो त्रयभुवनीं ॥ ४ ॥

अभय असावा असाच तव कर
येअिन चढुनीं मीही वर वर
ओळख मम मज होअिल नंतर
तो विकास घडवो तव चढणी ॥ ५ ॥

ओळख मज मम होता नंतर
मी तू यांतिल लंघुन अंतर
त्रय भुवनाचें कोडे सुंदर
विचारीन बघ तुज हंसुनी ॥ ६ ॥

## अनुष्टुभ्

शारदे बोल हे फोल । मोल तूझ्या कृपेवरी ॥
श्रीपाद सुत वंदोनी । अर्पितो चरणावरी ॥

---

# आस

## छंद अभंग

१

आस एक देवा, लागली मानसीं।
तारी पामरासी मायबापा ॥ १ ॥
नेत्रीं जडो तुझी, साजिरी ती मूर्ती।
भाव, भक्ति, प्रीति, अर्पियेली ॥ २ ॥
कर्णी साद राहो, नामाचाचि तुझ्या।
हाचि भाव माझा, दयाघना ॥ ३ ॥
गोड नाम तुझे, राहो सदा मुखीं।
आणिक ना इच्छी, अन्य कांहीं ॥ ४ ॥
नाम घेतां तुझें, होवो माझा अंत।
मज नाहीं खंत, देहाची या ॥ ५ ॥

२

तैल नाम तुझे, प्राण माझी ज्योत।
प्रकाश वा देत, उद्धाराचा ॥ ६ ॥
कल्पांत समीर, घोंघावे भोंवति।
सांभाळीं या ज्योति, विश्वेश्वरा ॥ ७ ॥
तेवत जोंवरी, आहे प्राण ज्योत।
नच लागो झोत, कल्पांतीचा ॥ ८ ॥

३

समिर तो तुझ्या, नामाचाचि वाहो।
प्राण ज्योत होवो, लीन त्यात ॥ ९ ॥

दि. ना. पळशीकर, हैद्राबाद.

# गर्व–हरण

पीत, नील, ताम्र, कृष्ण, शुभ्र वर्ण साजिरे
मत्तनूवरी, म्हणूनि रम्य रूप गोजिरें
इंद्रचाप तुच्छता मला सदैव भासली
देखणा दुजा नसे कुणी खचीत भूतलीं ॥ १ ॥

यामिनी कुह्रस फार वाटते भयंकर
अंतराळि यावयास घाबरे सुधाकर
अंधकार नाशुनी नभांत मी कसा चढे
तेजहीन तारका समस्त माझिया पुढें ॥ २ ॥

तारका असंख्य, मात्र एकटाच मी असें
भूमिमार्ग मानवांस मीच दाखवीतसे
दानशूर ! वीर ! मी परोपकारि ! अंबरीं
अन्य शक्त कोण तो मदीय जो करी सरी ॥ ३ ॥

× × ×

डोलतो जरा, असा करूनि गर्व दीप तो
तों समीर सूटला ! क्षणांत सत्य लोपतो
मी गुणी ! हुशार मीच ! फोल सत्य वैखरी
न्याय हाच " गर्व खालिं होतसे " खरोखरी ॥ ४ ॥

—सी. रा. बोरशे, शेंदुर्णी.

# विकासोन्मुख तूं प्रभात–प्रसून

[ जाति दिण्डी ]

बसे मेजाशी करित कामकाजा
हळुच सरकत येऊन बाळराजा
धरून खुर्चीचा शान्तपणें पाय
बघत राही निरखून मजासि,–काय ?
कुशीवरती तूं काहिंसा कलून
असा निश्चल किति पाहसी वळून
बघुनि बाळा उद्योग हे पित्याचे
विचारोर्मी कोणती मनीं नाचे ?
× × ×
चालवाया संसार हा–खटारा
ढोरकष्टें गाळितो घामधारा
कसें निष्फळ जाहलें जिणें माझें
तेंच का हो निरखिता बाळराजे ?
क्षेमसम्पादन बायका–मुलांचें
होय जीवितसाफल्य दुर्बलाचें
कींव केवळ का व्यक्त ही कराया
नजर ऐशी लाविता बाळराया ?
× × ×
मिळे कोरा मज ताम्रपट जिण्याचा
तयावरतीं संस्कार अक्षरांचा
करुनि ठेवी मी मगदुरानुरूप
तेंच कौतुक कीं लोचनीं अमूप ?
गणिसि अथवा कीं दवडि आयु तात
कुडालागीं तुम्बड्या लावण्यांत

प्रास-यमकांची काय दीपमाला
मार्गदर्शक व्हायची ह्या जगाला ?

× × ×

होय बाळा पणत्या नि शुष्क वाती
वसे सारित मी प्रभातीं दिनान्तीं
नसुन थेम्बहि आचार-तैल त्यांत
भ्रमें म्हटलें किति दिवे तेवतात
तुझ्या नयनींच्या हीरक-प्रकाशीं
आज बघता परि पारखुनि मनाशी
गालिचाचा आभास लया जाई
राखरांगोळी मात्र करीं राही

× × ×

श्रेय नाहीं ओढल्या खटाऱ्याचें
श्रेय नाहीं मारिल्या भराऱ्यांचें
हेंच अवघें निघतसे आज सार
इन्द्रचापा ऐवजी अन्धकार !
होइ आता जरि असा भ्रमनिरास
काय त्याचा उपयोग ह्या जनास
उलट उरलेला मार्ग थोडकाही
धमक चालुनि जायची नष्ट होई !

× × ×

विकासोन्मुख तूं प्रभात-प्रसून
कोम्भ वरती येतोस भुईतून
विक्रमाचा पथ आखुनी स्वयम्भू
श्रेयसाधनिं विश्वास होइ शम्भू*

यशवंत दिनकर पेंढारकर, पुणें.

* शम्भू-सुखदायक.

# हास्य माधुरी

( चालः—घे जिवा दृश्य हें० ‘ स्फूर्तिलहरी ’ )

हे सख्या बालका हांस हांस रे फिरून ॥ ध्रु० ॥

बघ निर्झर गाई गीत सुखद रंगुनी
दे अनिल मृदुल हा मधुसौरभ पसरूनी
मोहवी कोकिळा मंजुळ वच बोलुनी
परि तव हास्याची येइ मधुरता कुठून ? १

उगवता प्रभाकर कोमल किरणें जरी
सौंदर्य जगावर उधाळितसे क्षण भरी
फुलविती मनोहर सुमनें वेलीवरी
होतील स्तिमित तव हास्य-नवलता बघून २

त्या आकाशांतिल चेतोहर तारका
मधुहास्य ऐकुनी करितिल तव कौतुका
येतील जगावर सोडुनि नभिच्या सुखा
ओवाळण्यास निजकाया तुझिया वरून ३

कटु दुःख टिके नच तव हास्या पाहुनी
नैराश्य हृदयींचे जाय सकल वितळुनी
मन स्फटिकासम हो निर्मल तव दर्शनीं
कां अन्य सुखामागून पळे जग भुलुन ? ४

—सुधांशु औदुंबर.

शरीर दुर्बल झालें म्हणजे मनही दुर्बल होतें. १९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींतील एक सत्याग्रही कैदी दीर्घमुदतीच्या शिक्षेनें जेलमध्यें कोंडला गेला असून तेथें तापानें अजारी आहे. रात्रीच्या प्रशांत वेळीं दूर ३।४ मैलां-वर असणाऱ्या स्टेशनवर मेलगाडी आल्याची शीळ व आवाज ऐकूं येतो. कैद्याला सहजच घरीं जावें अशी इच्छा होते. पण... ? त्या वेळची त्याची मनस्थिति खालील पद्यांत वर्णिली आहे.

## आगगाडीस

( जन पळभर म्हणतिल हाय हाय ! )

चहुं मुलुखीं अविहत तुझी गती । मज पोचविशिल
तूं सांग कधीं ? ॥ चहुं मुलुखीं—

घर् घर भर् भर तव रव आणि । शीळ तुझी ती येतां कानीं
दृश्य तुझें मज दिसतें नयनीं । प्रियदर्शन उत्सुक मी होई ॥१॥

वाटे क्षण तव सवें निघालों । भरारि सरिसा सदनीं गेलों
द्वारीं सस्मित उभा ठाकलों । माला, गोप पुढें येती ॥ २ ॥

चिंतातुर मातामुख पाहुनि । दैन्य छटा ज्या आली वदनीं
मुलें अशी ती मजला बघुनी । अहा बिलगतीं येवोनी ॥ ३ ॥

गोड सानुला बोलवितां झणि । अपरिचितपणें मज पाहोनी
माता वक्षीं पुन्हा रिघोनी । मुरडुनि मान उरीं टाकी ॥ ४ ॥

" आलासि बाबा " म्हणुनी माता । पाठिवरुनि मम हात
फिरवितां । मी तत् चरणीं विनम्र होतां । अश्रु दोन मम
शिरिं पडती ॥ ५ ॥

जननी वचनें श्रम मम हरले । सती हृदय गतभारहि झालें
समाधान निश्वास सोडिले । सकलांनीं हें ये चित्तीं ॥ ६ ॥

भानावरि परि येतां पाहे । ज्वरें देह मम तळमळताहे
गर्भवास जणु दुसरा साहे । बंधन कांटेरी भवती ॥ ७ ॥

प्रियजन आणिक मी यामाजी । महदंतर सरिता वनराजी
परि तव साह्यें मी नच मोजी । कोट अभेद्य मनेंहि परी ॥ ८ ॥

पंख न मनुजा प्रत्यक्ष दिले । ईशें, तद्बुद्धींत लपविले
ते तव रूपें प्रकट जाहले । नेतिल मजला शीघ्र अती ॥ ९ ॥

आंग्ल हिंदु हे अग्नि जलासम । आज परस्पर नाशा कारण
ऐक्यें परि ते केव्हां तुजसम । जगत्प्रगतिकारण होती ॥
कृष्ण जन्म सम मंगल तो दिन । उगवो निखळो कारांबंधन
सत्वर उघडो द्वारनिरोधन । दीपोत्सव मग साच तधीं ॥ १० ॥

एरवडा कँप जेल
१९३२ दिवाळी

वा. गो. चिंचणीकर
वाङ्मय विशारद, चिकोडी.

# पारिजातकाचें फूल

[ चाल:— नृपममता रामावरती ]

मुलगा—

किती सुबक फूल हें दिसतें ?
अति मनास आनंदवितें ! हें पहा.
किति सुवास याचा येई,
मन माझें मोहुनि घेई ! बघ कसें ?
अति कोमल नाजुक फूल,
पाडितें मनाला भूल ! वरि वरी !
गोजिरें, जनीं प्रिय ठरें, आई बघ बरें
कसें हें फूल,
पाडितें मनाला भूल ! वरि वरी !

आई—

परिमलें डुलवितें सकलां,
सुख सर्व जनां द्यायाला ! लाडक्या !
तूं वाढशि जैसा जैसा,
प्रिय लोकां होई तैसा ! लाडक्या !
तूं कीर्ति गंध पसरून,
सद्‌गुणें टाकि दिपवून, ही धरा !
या परी, वागशिल जरी, माय भूवरी !
होशि प्रिय चिमण्या !
पारिजात पुष्पासम या ! या जगीं !

—बालकराम लक्ष्मण शेले, नांदेड.

# मरण–मैत्री

तूं थोर खरोखर मरणा जगतावरी
भीतना कुणा, फुका वल्गना, तुजपुढती ठरती परी ॥ ध्रु० ॥
ते ज्ञानी सुरगण ऋषिगण सारे उगी
ते राम, कृष्ण, शिव, अल्ला, येशू परी
तुजवरति चढाई कोणि न केली जगीं
तूंच रे परी, विश्वसंगरीं अजिंक्य हो अजवरी ॥ १ ॥
जें अहम् ब्रह्म तें घोषित योगावरी
जें कतृत्वाचें शास्त्रिय शोधाघरीं
जें भावभक्तिच्या मधुर सुवासांतरीं
सकलही परी तुझ्या अंतरीं दडती निमिषांतरीं ॥ २ ॥
त्वां कुठुन जादुची फुंकर सकलावरी
कीं गोड मोहिनी मोहक आत्म्यावरी
टाकुनी राहसी दूर जवळ वा उरीं
हे कळावें कसें ? भ्रांत होतसे, कौतुक वाटे जरी ॥ ३ ॥
मी कोण असे हें न कळे मजला जसें
हे विश्व अखिलही गूढ वाटतें जसें
त्या असो नसो वा चालक कोणी जसे
प्रश्न हा मला तुझा भ्रांतिला, तर्क न चाले दुरी ॥ ४ ॥
हे सर्व भ्रांतिचे पडदे कुठुनी तरी
कुणि अचूक उघडिल केव्हां कधि तो परी
ते बघण्या असणे नसणे तुझिया करी
म्हणोनी तुला भाव डिवचला सांगुन मैत्री करीं ॥ ५ ॥

१४–७–३६ —श्रीपादसुत सदलगेकर.

# " स्वर्गीं भेट घडेल ! "

## श्लोक

जन्मा येउनि अर्ध मासहि तुला कन्ये ! न झाला पुरा,
तों संसार पुरा करून अपुला गेलीस लोकांतरा.
वार्ता ही श्रवणांतरीं मम शिरे संतप्त तैलापरी
शोकव्याकुल जाहलों; उसळल्या खेदोर्मि हृत्सागरीं. १
" मेल्याचा करणें न शोक " वदती ज्ञाते अशीं भाषणें,
येतां तोच पण प्रसंग रडती तेही मृतांकारणें;
मायामोह निगूढ गूढ बनवी देवाधिदेवेश्वरा,
माझी काय कथा ? वृथा स्तुति नको; वेडा बने मी पुरा ! २
केली कां इतुकी त्वरा ? उठति या नाना मनीं कल्पना,
' कीं संसार असार ' खूण पटली अल्पावकाशीं मना;
' माया-जाल करील बद्ध पुढती ' ही भीति येतां मनीं,
कीं मुक्त्यर्थ्य उपासिला द्रुत तुवां प्रेमें जगाचा धनी ! ३
' कन्या एक असे दुजी उपजली कोणास होती हवी ? '
माता या कटुभाषणीं तुजसि कीं निष्प्रेमता दाखवी
आला कोप म्हणून ? " जन्म दिधला कां या स्थलीं तूं मला ? "
हें धात्यास पुसावयास्तव तुवां स्वर्लोक कीं गांठिला ? ४
निर्मी मूर्ति बहु श्रमें पण न ती चित्तास वाटे बरी
तेव्हां मोडुनि मूर्तिकार तिजला तो टाकितो; त्यापरी
होती ज्यापरि कल्पना न बनली त्वन्मूर्ति तैसी श्रमें
वाटे लाज; म्हणून शीघ्र तुजला नेई विधाता गमे ५
आनंदें नव मास भार तव जी वाहून गे ! स्वोदरीं
देई जन्म तुला; तुला नच जिच्या प्रेमा त्रिलोकांतरीं
गे ! नानापरि कष्ट सोसुनि तुझें केलें जिनें रक्षण
जावें लोटुनि दुःख-सागरिं तिला हें काय सल्लक्षण ? ६

झाली गोष्ट जुनी; उपाय नुरला सारें खरें हें कळे
बाळे ! शल्य परंतु हें निशिदिनीं माझ्या मनीं या सलें
केली मूर्ति तुझी अदृश्य अदयें कालें; तयाला पण
नष्टप्राय करावया स्मृति तुझी येणार नाहीं क्षण ! ७
रम्या मूर्ति न एकवार हि तुझी म्यां देखिली लोचनीं
कर्णीं आयकिला तसा न तनये ! त्वन्मुग्ध मंजु-ध्वनि
प्रेमें त्वन्मुख चुंबिलें न तनये ! ऐशा अभागी जना
बाळे ! तात म्हणावयास तुझिया वाटेल लज्जा मना ८
कन्ये ! दोष परंतु यांत लवहीं माझा न झाला खरें
हा ! हा ! योग असा घडूनच दिला त्या पूज्य विश्वंभरे
झालें दग्ध तुझ्या अखंड विरह--ज्वालानलें यन्मन
पाहें ! हा तव तात येथ करितों शोकाश्रुसंतर्पण ! ९
'प्रेमाचें जगतांत तात जननी ' बोलास या बोलती
तूतें प्रत्यय हाय ! पूर्ण उलटा आला खरा संप्रति
नेलें ओढुनि अंतकें तुज बळें तें सोडवाया त्वरें
कोणीही नच पातलो; सकलही गे ! दूर झालों खरें १०
केली ही क्षणभंगुरा नरतनू विश्वाचिया नायकें
मृत्यूतें चुकवावयास जगिं या प्राणी न कोणी शके
तूं गेलीस तसाच काल भरतां येईन मी जेधवां
स्वर्गीं भेट घडेल शाश्वत तुझी कन्ये ! मला तेधवां ! ! ११

—कै. विष्णु बाबाजी कुळकर्णी.

# गूढ ?

[ जाति– चंद्रकांत राजा० ]

सहज बैसलो चांदण्यांत मी दृष्टी वर करुन
तों आकाशीं तारा चमके चंचल होऊन ॥

क्षणभर चमके क्षणभर थबके खेळ असा करुन
चंचल नयनें टवकारी ही काय असे फिरुन ॥

विचार जो मी करित असा–तों–राही लाजून
एकाएकी कांहीं न कळे गूढ मना वरुन ॥

पाहु लागतां टक लावोनी मुग्ध मुखा दुरुन
अनुरागाची लाली गाली पुसट दिसलि भरुन

क्षणांत मुग्धा लाजुन उठली पदर सावरुन
चकमकाट तो आखेरीचा गगना दावून ॥

उतावीळ मनि चंचल नयनीं अधोमुखी पूर्ण
भूमिकडे ती धावत सुटली प्रियास शोधून ॥

परी चकवुनी गेली मजला मधेच ती विरुन
भूमि न येता प्रियासवे मधु प्रेमें रंगून ॥

गूढ पडे परी चित्तीं माझ्या प्रियकर कोण तिचा ?
अचूक झेलुन मधेच लपवी प्रेमें कायमचा ॥ १ ॥

— सुदर्शन चिक्कोडी.

---

## श्रीकृष्णा ! [ पद ]

कां निष्ठुर ऐसा झालासी तूं देवा ?
मजकडुनी चुकली तुझी कोणती सेवा ? ॥ १ ॥

तूं बळें झांकुनी डोळे, न कृपादृष्टी
मजकडे वळविसी; म्हणुनि फार मी कष्टी ! ॥ २ ॥

हा काल दरोडेखोर घोर अविचारी !
मज लुटुनी ने नर-रत्नें सुंदर भारी ! ॥ ३ ॥

मी प्रयत्न केला त्यास विरोध कराया।
पण माझे सारे यत्न जाहले वाया ! ! ॥ ४ ॥

बहु थोर नृमणिगण माझा मजला राहो
म्हणुनी मी फोडी कंठ फुटे तों टाहो ! ! ॥ ५ ॥

हा प्रसंग मजवर कठिण बघुन ओढवला
किति हाका तुज मारिल्या त्वरित येण्याला ! ! ॥ ६ ॥

अवधान-दान केलेस तरीहि न नाथा !
जाहलों जगीं या दीन अतां मी पुरता ! ॥ ७ ॥

इच्छिसी कोठवर अंत बघाया राया !
जाहल्या प्रार्थना माझ्या कां या वायां ? ॥ ८ ॥

म्हणतात तुला नतवत्सल करुणासिंधू !
मम कंठ शुष्क ! देसी न कृपामृत बिंदू ! ! ॥ ९ ॥

तूं माझा असुनी खरा जगीं या बंधू
हा कसा मला बुडवी दुःखाचा सिंधु ? ॥ १० ॥

तूं जगन्नाथ मम तात मूर्त बल असुनीं
पोरक्या परीं मी हिंडावें किति भुवनीं ? ॥ ११ ॥

वदतात संत तुज सदय विठाई माय !
परि केलें कां मजविषयिं कठिण तव हृदय ? ॥ १२ ॥

जर उचलुनि अंकीं तव न झणीं मज घेसी !
तर सत्वर मुकतों हाय ! निज प्राणांसीं ! ॥ १३ ॥

' नतवत्सल ' हें तव थोर बिरुद जाईल !
श्रीकृष्णा ! वेगें धाव ! पाव ! कां वेळ ? ॥ १४ ॥

कृ. बा. कुलकर्णी, चिकोंडी.

# झुंज

तूं असाच मजसी झुंज पुरा
तव भीति नुरे बघ लव असुरा ॥ ध्रु० ॥

जीवित धागे धरुनी हातीं
खेळ खेळसी ही खलनीति
अनुपम तुजपरि जीवज्योती
जाईल अचानक उडुन घरा ॥ १ ॥

जीवज्योती चुकवुन रिघता
हांससि आतां रडसिल पुरता
खेळ आपुला अपणा भंवता
कां कृष्ण मुखा निज करिसि करा ? ॥ २ ॥

समजुत तुजला कुठुन पटावी ?
भूक राक्षसी कशी निवावी ?
झुंज असाची घाई घाई
तंव क्षण न थांबवी गती जरा ॥ ३ ॥

ओढ खेचुनी धागे सारे
कळमळुनीया जीव गुदमरे
दूर दूर जग सांडुनी त्वरे
त्या जाता खेचुन घे समरा ॥ ४ ॥

मीपण माझे जीवज्योती
जिव्हाळ धागे त्याचे हलती
उघड झाप हो त्याच क्षणांती
जाइन येथुन मी परभारा ॥ ५ ॥

येई मज मग रोधायाला
रूप भयानक गिळावयाला
सकल प्रगटवी सामर्थ्याला
हांसत राहिन तुज सामोरा ॥ ६ ॥

पसर बाहु मग विशाल सारे
चपल गतीनें धावत येरे
त्रिखंड धुंडुन अंध कसारे
निराशतेनें कां सुस्कारा ? ॥ ७ ॥

तुरले मजला बाह्य रूपते
मीपण माझे मला न दिसते
कुठुनी तुजला सांग गवसते ?
हो व्यर्थ धावणे रे असुरा ॥ ८ ॥

ऐकुन वच मम उपहास्यानें
काळ भयानक क्रूर लोचनें
भीकर गर्जत तारस्वरानें
झेप घेइ तों थिजे पुरा ॥ ९ ॥

हांस्य मुखा मम बघुन निरंतर
कंपित काया त्याची थरथर
टकमक टकमक पाही वरवर
कां विलंब ? ये ये ये असुरा ॥ १० ॥

झेप न घेशी अजुन कसा तूं ?
काय वाटतो मनांत किंतू ?
स्वातंत्र्या मम भितोस कां तू ?
कधिं शूर भितो कां वद समरा ? ॥ ११ ॥

भंगुरता निज सामर्थ्याची
पटली कां ती तुझी तुलाची
म्हणुन धारणा मूकत्वाची ?
चल फिरू नको ये माघारा ॥ १२ ॥

## अनुष्टुभ्

करोनी झुंज काळासी । कंठणे आयु या जगीं
श्रीपादसुत काव्याते । गुंफिता भाव हो उगी ॥

४-५-३९

---

# प्रेमसमाधि

असाच वाचत होतो पुस्तक पडल्या-पडल्या खिडकींत
—आर्तस्वर कोठून कुणाचा कानावरिं ये इतुक्यांत !
जरा पाहिलें, तों मज दिसलें,— राघूमैना बसलेली
फांदीवरतीं एका, होती पहात परि दोघें खालीं
क्षणाभरानें मैना कुठल्या कोठें उडुनी दुर गेली
राघू तर तो अश्रूं ढाळित करीतसे तों वर—खालीं !

× × ×

असेंच कांहीं दिवस पाहिलें फांदीवर तो येत असे
एकें दिवशीं पाहियलें तर खालीं पडलें शव त्याचे
मनांत माझ्या आलें कांहीं, पुरला जागीं त्यां तेथ
आणि बांधली एक समाधी त्यांवर त्याच्या
स्मरणार्थ !

× × ×

असेंच कांहीं दिवस पाहिलें, दिवस त्यापरी तो
तसला !
मैना बसली ती जागेवरि, हलेच ना कांहीं केल्या !
पटली त्याची खूण वाटतें, दुःखभरें ती ओरडली
हालचालही कांहीं कालें बंद तशीच तिची झाली !
किती वेळ मी असें पाहिलें, जवळ जरासा जों गेलों
मेली मैना तिथें येउनी—तसें कळूनी तों चुकलो !

चिमण्या मैने अहा ! काय ही उत्कटता तव प्रेमाची !
असेल कां गे ! अशीच मैना जगांत माझी प्रेमाची !

× × ×

वेड्या मैने ! असाच देशिल मेल्यावरि जरि मज मान
निराश हें मन हांसत राहिल तिन्ही काळ मग प्रेमानं !

× × ×

—शान्ताराम नारायण टिपणीस, पुणें.

# तान्ह्या मुलास पाहून

( जाति—भूपति वैभव )

हा तान्हा नोहे, कान्हा जन्मा आला ।
स्वानंद स्वर्गिंचा देह-वसन नव ल्याला ॥

चंद्राचीं किरणें ल्यायाचीं सोडून ।
वस्त्राचि हौस जणुं हा घेई फेडून ॥

पाहुनी तुझे हे पाळण्यातले चाळे; ।
खुळखुळा खुळखुळे आणिक घुंगुरवाळे – ॥

मी राजी होई; राजस रंजक राजा ! ।
हा तुला देइ मी, खाई, खाऊ—खाजा ॥

तुज गुलाब कीं केवडा म्हणावें वाटे ।
छेः नको; तयांना असती, कारण, काटे ! ॥

तुज गंगा म्हटलें तरी गढूळ न होसी ।
चंद्र, त्या कुणी चुंबिलें ? हि सांगा मजसी ॥

प्रतिमा तूं पावित्र्याची गमसी मजला ।
नास्तिका निरुत्तर करण्या ईश च सजला ॥

तुजसंगें असतां पाप न स्पर्शू शकतें ।
' निर्बल संरक्षक ', सत्य विरोधी पटतें ॥

तूं हंससी कां रे ? स्मृति तुज गत जन्मींची ।
झालि का सांग, तव भल्याबुऱ्या करणींची ॥

काय हें ! अतां तूं विचार कसला करिसी ? ।
कीं दुष्टाव्याचीं जाळीं पुढचीं विणिसी ? ॥

होणार काय तू ? टिळक शिवाजी गांधी — ।
गडकरि रविवर्मा रामन् ? वद मज आधीं ॥

कुलदीपक, सेवक धर्मांचा देशाचा ।
लडिवाळा असशिल होणार पुढें साचा ॥

परि विचार माझे तुजवरि कां लादावे ? ।
निर्विकार, तू मज क्षमा करिशि ना भावें ? ॥

मोही मम मन तूं मांगल्याची मूर्ती ।
प्रेमाची, पापा देउनि करि रे, पूर्ती ॥

—भा. ल. रानडे, बी. ए. सांगली.

# भारताचें उज्ज्वल–भविष्य

स्वातंत्र्याचा सूर्य एका काळीं या भारतभूमीवर प्रकाशत होता. कालक्रमानें आतां तो मावळून पाताळलोकीं गेला असला, – पाश्चात्य देशांना प्रकाशवीत असला तरी, आज ना उद्यां पुन्हा पूर्व क्षितिजावर उदित होऊन भारताचें भाग्यही उदयास आणीलच.

[ चाल– स्वतंत्र मी होणार, आतां सुंदर मी होणार ]

स्वतंत्र ही होणार हिंदभू– सुंदर ही होणार !
भाग्यसूर्य या भूवरि होता तळपत तेजें फार
जाहला जगताला आधार
ज्ञानाचे नवकिरण फेकिले उघडुनि निजभांडार
करविला ईश्वर साक्षात्कार ॥
व्यास वाल्मिकी वसिष्ठादिकीं वेदांताचें सार
शिकविलें जगता ज्ञान अपार
राम कृष्ण नरवीर पार्थ कीं बुद्धासम अवतार
इतर ही देशा उद्धरणार
कला कुशलता सुधारणा ही गेली शिखरापार
संपदा वाढे अपरंपार
ते दिन गेले, तो रवि ढळला, कालचक्र अनिवार
ओसरूं लागे वैभव सार
क्रमें क्रमें पाश्चात्य देश तत्तेजें चमचमणार
वैभवें शूर वीर ठरणार !
इराक आरब मिसर टाकुनी अज्ञानाचा भार
जिंकण्या जग झाले तैयार

तेथुनि पुढती ग्रीस रोम कीं युरोपीय उठणार
विभव-रवि त्यांना जागविणार
शोध, यंत्र, उद्योग, त्रयीनें मान उंच धरणार
जगाला पदाक्रांत करणार
अमेरिकेवरि आतां तळपे पूर्ण तेज-संचार
करी जणु मध्यान्हीं असणार
परि आतां पश्चिमे कडुनि तो दिसे सूर्य वळणार
पुन्हा पौरस्त्य देश वरणार !
जपान झाला जागृत गेल्या शतकार्धांतचि फार
जगीं सन्मान्य स्थान घेणार !
चीनावरिही त्याचे मंगल कोमल कर पडणार
दिसतसे त्यांना जागविणार
भारत-भाग्यविधाता-भास्कर उदित पुन्हां होणार
सुचिन्हें कथिती हा निर्धार
लाखो सत्याग्रही वीर हे स्वार्थ करुनिया ठार
बंधनीं जाती बेदरकार
तिलक गांधिसम शुक्र, अरुण, चैतन्य जनीं भरणार
सुचविती दिनकर वरि येणार !
अनर्थकारक जुनीं बंधनें खळखळ तीं तुटणार
अम्हाला बंध मुक्त करणार.
परवशतेची घोर रात्रही आतां ओसरणार
सुखद स्वातंत्र्यकिरण पडणार
विद्वेषाचीं भेसुर भूतें स्मशानांत गढणार
प्रकाशीं तोंड न दाखविणार
परस्पर-अविश्वास अंधतम पूर्ण नष्ट होणार
प्रेममय ऐक्य खरें घडणार !
खरा हितैषी हितशत्रूही आतां ओळखणार
भेदकर स्वयेंच मग पळणार !

उं हूं ! तुम्ही अपात्र म्हणतीं घुबडें तीं दडणार
अंध अन् निःसहाय होणार
लुक लुकुनी टुक टुक दाखविते तारे हे लपणार
पसारा त्यांचा आटपणार
लचके तोडिति हिंस्र पशू ते निजधामीं जाणार
जात परि लोभें तडफडणार
जरी राहिले उदराशेनें दास म्हणुनि राहणार
दंत नख अमुच्या करिं देणार !
कायमचे पद-दलित अम्हाला कोण करूं शकणार ?
कुणाची प्राज्ञा ती असणार ?
सृष्टिक्रम हा पुन्हां अम्हाला शुभदिन दाखविणार
कोण त्या कसा आड येणार ?
मावळला स्वातंत्र्य सूर्य तो उदित पुन्हा होणार
स्वराज्यें जगता दीपविणार
उठा उठा भारतीय जनहो, करा अर्घ्यसंभार
अर्पुनी साधूं देशोद्धार !

येरवडा कँप जेल
जानेवारी १९३३

— वा. गो. चिंचणीकर
वाङ्मय विशारद, चिकोडी.

---

# चिमण्या-फुलपांखरास-

चंद्रकांत

वेड्या फुल पांखरा कशाला उंच उडूं बघसी ?
चिमणे चिमणे पंख हालवुन काया का छळिसी ? ॥
सभोवताली फुलले ताफे गुलाब जाइ जुईचे
गंध तयांचा कां मोहविला तुझिया चित्तांते ? ॥
स्वैर भटकती बांधव गणतव पाहुन कीं वाटे-
त्या सम आपण विहार करूया होऊया मोठे ॥
तिथेंच उडुनी तिथेंच बसणे ऐसी मंद गती
असह्य झाली कां तुज चिमण्या म्हणुनी धडपड सी ? ॥
कर्तृत्वाची स्फूर्ती आली अवचित कीं अंगी ?
विस्मरिसि निज सामर्थ्याला चढोनिया धुंदी ॥
करुन जिवाचा त्रागा ऐसा कष्टणार किति तूं ?
शक्तीविण धडपडीत राहिल केव्हांही किंतू ॥
तत्व अबाधित कसे कळावे तुजला जगताचे ?
उंच मनोरे तुझिया हृदयां मोहत आशेचे ॥
दृष्टि लागली तव- आशेच्या उंच शैलशिखरीं
यशापयश ते कुणी पाहिले ? धडपड मात्रपुरी ॥
पाहुन ही तव एकतानता झालो गुंग पुरां
चिमण्या जीवा निरुत्साहि तुज कशास अव्हेरा ॥

ता. २४-३-३९

—कुमार- जे. बी. कोकितकर,
बेळगांव.

# ‘ बालक आणि बालपण ’

सुवर्ण, रत्नें, मौक्तिकादि जें वैभव पृथ्वीचें ।
सशक्त सु-गुणी बालाविण तें व्यर्थ होय साचें ॥
निसर्गतेचें सुरम्य लेणें बालक मनुजाचें ।
स्वर्गसुखाचा खरा लाभ हा कौतुक बहु त्याचें ॥
बोल बोबडे हंसतमुखानें बोलुनि हांसविती ।
कसलेले जणुं विनोदि नट हे भाषण रंगविती ॥
होउनि गवई खुल्या स्वरानें गाउनि दाखविती ।
कर्णमधुर त्या ताना परिसुनि मोद अती चित्तीं ॥
किल्ला बांधुनि सभोंवताली बाल सैन्य जमतें ।
सेनापति आणि राजा येतो लढाइ तंव होते ॥
दुकान घालुनि बनिया बनुनी देवघेव करिती ।
अर्थोत्पादन-मुहूर्त-मेढी शिशुपणि रोवीती ॥
‘ मी मी ’ म्हणती अशांस करिती कुशल प्रश्न किति ते ।
अचूक उत्तर देतां नच ये मीपण मग जातें ॥
हांसत नाचत खेळत प्रेमें अवनीवरि ताले ।
पर्णकुटीचें नंदनवन तें बनविति हीं बाळें ॥
बाळपणाचा काळ मजेचा स्वतंत्र वृत्तींचा ।
अनुकरणप्रिय सगळ्या उत्सुक बालक-राजांचा ॥
चळवाळि वृत्ती असे मुलांची भूषण बालपणा ।
चौकसबुद्धी पहा छेडिते विचारमय-वीणा ॥
बालक-कलिका मोद-उपवनीं फुलुं द्या जोमानें ।
सु-मति-तरुवरी फुलुनि भारता देतिल सुख-सुमनें ॥
ज्ञान-जलानें सु-मति-तरुवरा शास्त्रशुद्ध विकसा ।
तन, मन जाणा या तरुशाखा शास्त्रशोध पेसा ॥ १ ॥

निपाणी
ता. १-३-३९ } . ग. दा. सगरी, शिक्षक.

# न्याय !

न्यायाचा वाजे डंका । हक्काचें फुंकुन शिंग
दुमदुमोनि भू आकाश । जगताला करितो दंग
हक्काच्या न्यायासाठीं । जन सारे बांधुन चंग

धडधडत्या कुंडामाजी
वीरात्मे कोणी गाजी
देहांचीं मोले ताजी

देवोनी जाता येई । न्यायावर खोगिर भरती ॥ १ ॥

देहाचें देती मोल । न्यायासन व्हाया विमल
परि गालबोट विश्वाला । स्वार्थाचा कलंक काळा
गति त्याचीं अखंड चाले । विश्वाचें जीवित हाले

जग मोहुन सारे गेले
त्या साठीं जीवित केले
उपजले आणखी मेले

परि त्यांचा उगाच हट्ट । न्यायाचीं म्हणती मदत ? ॥ २ ॥

जगताच्या बाजारांत । न्यायाचें नुसते प्रेत
जगताच्या बाजारांत । सत्याचें नाचे भूत
जगताच्या बाजारांत । ढोंगाला मोलहि येत

हा कराल पुरुषही आला
धर्मवीर म्हणती याला
न्यायदेव म्हणती याला

आहाहा मूर्ती याची । आधिष्ठित न्यायावरती ॥ ३ ॥

हातामधिं घालुन हात । न्याय स्वार्थ जोडी झाली
वास्तवता पायाखाली । नृत्याचीं उडत धुमाळी
पोटावर मारून हात । तोंडपुजे देती टाळी
प्रेक्षकगण तेथें जमला
अंतरंगिं काळा काळा
कृत्रिमता ज्यांचा चाळा
सकलही देत साथीला । नृत्याला मोहर आला ॥ ४ ॥

वास्तवता विवळे खाली । चीत्कारून ये किंकाळी
तोंडातुन रुधिर नदी ती । भड भड भड आली खाली
हाडांचे तुकडे बनुनी । रुधिरावर येती तरुनीं
नेत्रांतुन ज्योती उठल्या
जीवाच्या तारा तुठल्या
आशेच्या आशा मिटल्या
वास्तवता पूर्ण निमाली । प्रेत तिचें नृत्याखालीं ॥ ५ ॥

दमलें तें नृत्य करोनीं । आलिंगिति प्रेम भरानी
रक्ताचें भरुनीं पेले । पीत उभे आनंदानीं
न्यायाचें देऊं दान । वास्तवता रक्त पिवोनी
बोलोनि अेवढें बोल
न्याय स्वार्थ फिरती गोल
माजला खालती चिखल
मौज त्यात औरच आली । न्याय स्वार्थ पिंगा घाली ॥ ६ ॥

वास्तवता मेली बघुन । चर्म तिचें काढुन घेती
आंथरूनीं पीठावरती । न्याय पीठ त्याला म्हणती
न्याय स्वार्थ दोनी-मूर्ती । आधिष्ठित तेथें होती

न्यायदान कर्म तयांचें
विश्वावर अखंड नाचे
काधिं भय ना त्या काळाचें
आरंभीं आणि अंतीं । न्यायाचीं तेवत ज्योती ॥ ७ ॥

अनुष्टुभ्

हे असे न्यायदानाचें । नृत्य रोज जगावरी
श्रीपादसुत काव्यातें । गुंफुनी दाखवी जरी ॥

———

# इशारा !

तारुण्याचा खेळ मजेचा हा पुरता भवला
करि अंगाई जलाशयीं या कायमची बाळा ॥

बघू नको तूं टक लावुनिया माता ही कसली ?
सूड घ्यावया गतजन्मींची वैरिण तव सजली ॥

कशास बघशी टकमक टकमक, "पाप" मला गमसी
मीट एकदा डोळे अपुले—नख लावी त्यासी ॥

लाटा संगे वाहतसें जरि दूर दूर बाळ
ती जीवाचे धागे ताणुन झुकवितसे तोल ॥

क्षणात उठले त्या जलि बुद्बुद खळखळाट झाला
हास्यस्मित जणु बाल मुखावर भासे त्या काला ॥

जीव जाहले दोन जगातुन नाहींसे पुरते,
कारण राहीं मात्र जगावर आनंदे हंसते ॥

कारण कसले तारुण्याचा खेळ चोरटा हा
चोरुन मारुन असाच नाशी असंख्य जीवाहा ॥

सावध व्हाग कुमारिकानो तशाच विधवाही
प्राण घातकी खेळ खेळुनी फसवणूक कांहीं ?

प्रथम घालणे प्रिय पुरुषावर बंधन लग्नाचे
खुशाल पुरवा भावपुरे मग ते तारुण्याचे ॥

ना तरि मरणे अशाच फसुनी बाळा घेवूनी
या जगताच्या बाजाराला रामराम करुनि ॥

— सुदर्शन, चिकोडी.

# छळणूक

[ चाल- आनंदकंद ऐसा ]

छळणूक ही जिवाचीं । कधि थांबणार देवा ॥ ध्रु ॥
हृदयीं अखंड माझ्या । जो राहि प्रेम ठेवा
जाईल तो कुठून । त्यागून जीव भावा ॥ १ ॥

अक्षम्य दोष जरिहा । ठरला तुझ्याहि दारी
जावें अम्हीं कुठेरे । तुजवीण कोण तारीं ॥ २ ॥

छळणूक या जिवाची । सांगावयास आले
वनवास साहवेना । मी पूर्ण शून्य झालें ॥ ३ ॥

घनदाट जीविताची । सरणार रात्र केव्हां ?
तुजवीण आसदीप । कुणि दाविणार देवा ॥ ४ ॥

— शारदा गुजर, तळेगांव दाभाडे.

---

# भेट

बावरी होऊन पाही   बाळ कोठेही दिसेना
वाजता पाऊल दारी   धावली वेगे पहाया ॥
पाहता कोणीच नाही   जाहली वेडी पिसीती
चालली शोधीत मार्गे   बाळ कोणी पाहिला कां ? ॥
बाळ कोणी पाहिला कां ?   बाळ कोणी पाहिला कां ?
बाळ कोणी पाहिला कां ?   बाळ कोणी पाहिला कां ? ॥
शब्द बोले दीनवाणी   येइना करुणा कुणाला
लोचनी दाटून पाणी   शब्द कंठींही फुटेना ॥
ग्रासली दुःखे जरी ती   धीर ना सोडी मुळींही
बाळ माझा खास भेटे   आसही चित्तीं धरोनी ॥
चालली वायूगतीनें   वीज भासे ही धरेला ।
कुंठली वायूगती ती   पाहता मार्गी समूहा ॥
लोटुनी गर्दी कराने   काय पाही हाय ! तेथें
येउनी मोटार वेगे   बाळ तें चुरडोन गेली ॥
दृश्य ते पाहून ठेली   त्याक्षणी निःशब्द झाली
मर्त्य देहा सांडुनी या   भेटण्या बाळास गेली

## अनुष्टुभ्

भेटही मायलेकांची । खेळणे काळ तो करी
श्रीपादसुत अश्रूंचे । लोटले पूर आवरी ॥

४-६-१९३४.

---

# सुप्रभात

चाल—**महाराष्ट्रगीत**

धवल विमल अतुल प्रभा उजळि दशादिशा
हलत डुलत रमुन गात गान मधुरसा ॥ धृ० ॥

मत नाद मंदमंद अखिल भूवरी
गुपित कानि कुजबुजेहि मोह आवरी ।
ऊठ ऊठ अजुन काय निजसि मानवा
हो प्रभात दूरसार पटल हो नवा ॥
झोप पुरे झोप पुरे मंजुरव असा । हलत डुलत रमुन० ॥१॥

पटल दूर हळूहळू नाद लहरिया
जात लया जागृतीस निघाति यावया ।
उमलतात नयन कमल भ्रांत तो अहा
सुप्रभात स्फूर्ती गीत गात उभे पहा ॥
कार्य वलय तेज प्रभा दिसत दशादिशा । हलत डुलत रमुन० ॥२॥

—(सुदर्शन), चिकोडी.

---

# जीविताचें गणित !

( जातिः— केशव करणी. )

ईश-शिक्षकें हुषार समजुनि गणित घातियेलें ।
हाय ! परि माझें तें चुकलें ॥ ध्रु० ॥
शर्यांनि मी मृत्युच्या आडवा पडलों असा,
मागुतीं पाहिला आयु-ओघ लांबसा,
भैरवी ह्मणे मी, नसे अतां भरंवसा !
जीवन-गणिता काल-कागदीं करुनी दावियलें
हाय ! परि माझें तें चुकलें ॥ १ ॥
दोषांची भांजणि हि चढती, बढति वाढवीतसे
ओढिते चढत्या जीवा कसे !
हा गुणाकार कीं घोडचुकांचा महा
तें ' चक्र ' व्याज बेतांचें फसल्या पहा
अपयशां यशानें इथें भागिलें अहा !
बेरिज सुफलित आशांची ही बारिक कितितरि दिसे
निराशे ! लाविलेंस मज पिसें ॥ २ ॥
आयुष्याच्या आकांक्षांची होळी झाली पुरी
चुकलें अतां कसें सांवरी ?
हीं भुतें निराशा-रूप भेडसाविती
हा जीव गुदमरे, कां नच होई इती !
जरि मरेन, लाविन गणिता दुसऱ्या रिती
परि ह्या जन्मीं अनंत अश्रू जरी ढाळिले, तरी
चुकलें अतां कसें सांवरी ? ॥ ३ ॥

—भा. ल. रानडे, बी. ए. सांगली.

# अपेक्षा

जाति— मंजिरी

हे जिणे कशाचे वाळवंट वैराण
रखरखे तयावर खल निंदा ऊन ॥
हे हृदय कशाचे आहे मजला नकळे
या किती जिव्हारी घाव तरी ते बसले ॥
जे देव म्हणोनी प्रेमे हृदयीं धरिले
ते दगड होवुनी गळुनी खाली पडले ॥
जे अमृत म्हणोनी प्रेमे अधरी वरिले
ते हालाहल विष सर्वांगीं मम उठले ॥
ज्या प्रेमदेविनें हृदय सुमा मम हरिले
खेळुनी राक्षसी खेळ तयासी चुरले ॥
ज्या बाल म्हणोनी लालन पालन केले
ते कालसर्पची अखेर मजला ठरले ॥
हे असेच आणिक कितिक जिव्हारी घाव
बसले हृदयि या अखंड होवुन ठेव ॥
ते अचूक जमती एकांता मज बघुनी
डिवचती सुऱ्या उपहास्यीं मन कोंडोनी ॥
त्या भरांत येती सूड शब्द हे ओठीं
पण हळव्या मनिची दया करी अडकाठी ॥
कल्लोळ असाहा सतत जिण्याच्या पाठी
हा सांग चुकावा कसा तूंच जगजेठी ? ॥
ही नकोच काचण जितेपणीचे मरण
तूं करी खरोखर बाळ तुझा अज्ञान ॥

२५-७-३५ —श्रीपादसुत सदलगेकर.

# माझी स्थिति

प्रेमामृत प्राशिता गुरूचे । धन्य धन्य झालो
गोडी घेता त्या प्रेमाची आनंदे धालो ॥

त्या प्रेमाच्या आठवणीनें स्वेदकंप उठती
देह भावना नाठवि चित्ता कुंठित होय गती ॥

क्षणांत हंसतो क्षणांत रडतो भीति न काळाची
थुयिथुय करुनि नर्तन करितो स्थिती ही वेडाची ॥

सगेसोयरे वेडा वेडा, वेडा मज वदती
जाणिव मुळिना परी तयाची उमगे मम चित्ती ॥

वेड विरोनी जातां माझे जागृति जी येई
असमाधानीं लोंटुनि देते सौख्य नाश होई ॥

खेळ असा हा सतत चालला कारण काय असे ?
नकळे तरिही चित्ती माझ्या सद्‌गुरु वेड वसे ॥
स्थितीही माझी कसली नकळे मूढ पुरा बनलो
तुजाविण सद्‌गुरु वेडा म्हणुनी देहभान विरलो ॥

ह. बा. उर्फ पंडितराव कुलकर्णी रांगोळीकर

( ज. इचलकरंजी. )

# जीवन–वसन्त–

[ चाल– भारती सृष्टींचें सौंदर्य ]

जीवन-वसन्त फूलला ये, ये
लेवूनी शृंगार स्वागतां प्रीये
नाचूं ये, हासूं ये गुंफूनी कर
झोलें घेऊं सखे हिंदोळ्यावर
प्रणय—उद्यान फूलवूं आणि
करूनी नर्तन, गाऊनी गाणीं
कोकील कूजन सुस्वर कंठे
गाऊनी जनांसी ऐकवूं मोदे
हंसत, नाचत जाऊंया दूर
वाहूं दे उल्हासे प्रीत–निर्झर
वायू लहरि संगे जाऊं अंबरीं
चंद्रीका बनूनी बसूया वरी
घालूं ये पुष्पांचा भूमिसी सडा
होऊनी विहग करूंया क्रीडा
'जीवन–वसन्त' फूलवूं आणि
हंसूनी, नाचूनी, गाऊनी गाणीं

— दि. ना. पळशीकर
हैद्राबाद ( दक्षिण )

---

# भाषण

असत्याचा लवलेश ज्यांत नाहीं
कुणा थोडीशी यातना न होई
कटू, बीभत्सहि शब्द तशी निंदा
नसे किमपी फाजील स्तुती सुद्धां ॥ १ ॥

कुणाचीही होणार हानि नाहीं
लाभदायक होईल रिपूंनांही
विनय गोडी परिपूर्ण त्यांत राही
सुखद होइल जें अन्य-अंतराही ॥ २ ॥

अहंकाराचा त्या न शिवे वारा
हास्य-लहरींचा नित उडे फवारा
अन्य जीवा लागेल अशी खोच
जयामाजीं नच तेंच वचन उच्च ! ॥ ३ ॥

—सी. रा. बोरशे, शेंदुर्णी.

# एक स्वप्न

अफाट सागर भवति पसरला नजर फिरे चौफेर
मागे पुढती खाली पाणी बघुन सुटतसे धीर ॥
आकाशाची अमर्याद ती नील पोकाळि तशांत
देत दुजोरा वाराही तो वाहतसे जोरांत ॥
बाहु पसरुनी वृक्ष लताही आक्रंदत—जीवास-
शांति मिळाया शेवटचीती कवाळिति परस्परांस ॥
लाटा संगे नाव चालली सागरि या समयास
जीवन रूपी जीवन रूपी हेलावित शब्दास ॥
आत बैसले मानव-कोणी धरुन सुकाणू वीर
वल्हविण्यासी सोडित होता हुकुम-जिव्हारी वार ॥
धूळ लोटली दाहि दिशावर गरगर भवति फिरुन
नेत्र झाकिले आटोक्यांतिल सर्वांना रोखून ॥
वादळ उठले क्षणांत डुलकी नाव घेत सलिलांत
पीडु लागला नावेतिल त्या लोका झंजावात ॥
घाबरले किति धीटहि उठले जीवित रक्षायास
ढुंकुन पाही कुणी मुळि न परि तेथिल कप्तानास ॥
जीव तोडुनी-शिकस्तीचा तो जनहे रक्षायास-
करीत होता प्रयत्न पण त्या कोणि न हो समयास ॥
तोंची उठली बाला कुणिकीं सोडुन जीवन आस
कप्तानाला करू लागली अनेकाविध साह्यास
कृतज्ञ दृष्टी वरी उचलली पहावया बालेस
नाव बुडाली, नांव बुडाली, शेवटचा तो श्वास ॥

× × ×

दुसरे दिवशीं कुरणावरती प्रेते दोन असून
प्रसन्न वदने निजली होती परस्परा कवळून ॥
किरण अक्षता बालरवी तो अरुणोदयिं टाकून
अश्रू मौक्तिक माला घाली हाय ! एवढे वदून ॥

अनुष्टुभ्

विरोनी स्वप्न ते गेले । जागृती जों न ये मला
" श्रीपादसुत आश्चर्ये । गुंफुनी मूढ जाहला ॥

---

# चैतन्य

## ( राजहंस माझा निजला )

[ गजगतीनें समोरून येणाऱ्या सुंदरीस पाहून ]

भुललासी सांग कशाला ? चैतन्य चालतें बाळा ॥ ध्रु० ॥

गजगती कुठुनि ही झाली, प्राप्त या अशा अबलेला ॥
भ्रमरा सम कुंतल कुरळे, सांवरी गमे तुज बाला ॥
परि सावरण्या बल कैंचें, आत्मा जरि सोडुनि गेला ॥
मग फिकें सकल हीं; याला
कोणीहि विचारि कशाला
दुर्गंध-सदन वदनाला
करि विचार पूर्ण मनाला, चैतन्य चालतें बाळा ॥१॥

पाहुनी रुचिर नयनाला मोह कां पडे वद तुजला ? ॥
ऐकतां मृदु-मधुर बोला, लोभले श्रवण कां बोला ?
गाल हा गुलाबी असला, स्पृहणीय सांग कां झाला ?
रे खुळ्या सकल हे त्याचे
खेळ तया जगदीशाचे
हालवी सूत्र जगताचें
तोच रे चहुंकडे भरला-चैतन्य चालते बाळा ॥

सांगली महॅ घाट
१९२०

वा. गो. चिंचणीकर,
वाङ्मयविशारद,
चिकोडी.

# लोकोपकार

## दिंडी

सुधाराहे परिपूर्ण भरुन ज्यांत।
अशा किरणांनीं अखिल वस्तुजात ॥
चंद्र करतो अभिषिक्त तो कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ १ ॥
खचित वाटे प्राण्यांस अमृतवृष्टी।
अशा धारांनीं सकल जगा तुष्टी ॥
मेघ वरचेवर देतसे कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ २ ॥
परम रुचिकर सुखकारि निजजलांनीं।
भूमि भिजवित सुखवीत तसे प्राणी ॥
नद्यादिक हे जगिं वाहती कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ३ ॥
अखिल जीवांच्या मना सुखद भारी।
परम दारूण घन तमोनाशकारी ॥
अशी किरणें रवि धाडि जगिं कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ४ ॥
लया नेवोनी सर्व दुष्ट गंध।
जगा वितरी जो कुसुम मधुर गंध ॥
पवन निशिदिनिंही वाहतो कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ५ ॥
प्रखर सूर्यांशु स्वीय शिरिं धरून।
सदा सुखविति पांथास तापवून ॥
लवति फल भारें तरुहि ते कशास ?।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ६ ॥

बघुनि सद्रस ज्यातील सुधा घाली ।
परम लज्जा पावून मान खालीं ॥
अशी काव्यें कवि गातसे कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ७ ॥
प्रपंचाचाही त्याग करुन ज्यानीं ।
लोक बोधाचीं धरालि मनिं शिराणी ॥
संत करिती सद्बोध ते कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ८ ॥
मधुर ताना घेवून पंचमांत ।
रसिक चित्ते लोटीत सुखाब्धींत ॥
आम्रवृक्षिं पिक गातसे कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ९ ॥
जिवाचीही पर्वा न बाळगून ।
शोध लाविति शास्त्रीय नव झटून ।
सार्थ 'शास्त्री' ते श्रमति अति कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ १० ॥
उष्ण शीताची भीतिही त्यजून ।
दुष्ट निर्दयकर नाशहि न गणून ॥
फुलें जगतीं फुलतातही कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ ११ ॥
बहुत शीत-त्रस्तांस सुखवि फार ।
अन्न जीवां जो करून दे तयार ॥
अग्नि तो या जगि पेटतो कशास ? ।
हेतु यातिल लोकोपकार खास ॥ १२ ॥

कै० दामोदर बाबाजी कुलकर्णी, कल्लोळकर,
चिकोडी.

---

# प्रेम-आशा

जरी न मिळे तें अन्न शरीरातें,
जरी न मिळे जल, वस्त्र धारणातें,
जरी न मिळे-धन, कीर्ति मानवाला,
प्रेम-आशा ही जगविते जिवाला,

किती संसारीं सोशितो छळातें !
किती भोगे तो कटू अनुभवातें !
न सोडी परि ध्येयासि धैर्यतेला,
प्रेम-आशेची बंधनें जिवाला,

प्रेम-आशार्थी जगीं जीव राही,
प्रेम-आशेनें जीव पूर्ण पाही;
प्रेम-आशार्थी जीव जिवा भेटे,
प्रेम-आशामय जणूं विश्व वाटें !

प्रेम-आशेचे रम्य खेळ जेथें,
घडे जीवाला अती सौख्य तेथें;
प्रेम-आशा राहते ज्या जिवांत
वसे तेथें आनंद मूर्तिमंत.

— रा. द. लाटकर. कोल्हापूर.

# जगता पार

जाऊ जगतापार—

सख्याचल जाऊ जगतापार ॥ ध्रृ० ॥
नसेल जेथें भेद कशाचा
मानगुणावर गुणीजनांचा
लेश नसेही कृत्रिमतेचा
निष्कपटाचें नंदन वन ते करु तेथें संसार ॥ १ ॥

हृदयाचें कारंजे भरुनी
प्रसन्नतेनें थुइ थुइ करुनी
भाव तुषारा सिंचतवरुनी
आनंदाची कळी उमलती जेथें बघ खुलणार ॥ २ ॥

उच्च नीचता जिथें निमाली
मानवतेची ज्योत तेवली
निर्मलतेची सृष्टी सगळी
प्रेमळतेच्या कोमलतेवर न्यायाचा दरबार ॥ ३ ॥

दिव्य वनश्री जिथें शोभली
झुळु झुळु गंगा वाहत आली
ठाई ठाई कमले फुलली
करित कोकिला गान तिथें बघ वास अम्ही करणार ॥ ४ ॥

वैभव तेथिल सुंदर मंगल
निर्मलतेनें दिसते उज्वल
हीन भावना जळुनी जाइल
आहे तेथें देविशारदा सिंहासनि बसणार ॥ ५ ॥

ऐकु तियेचे सुस्वर गायन
आणिक मंजुळ वीणा वादन
असेल तेथें कोठुन बंधन ?
विसरून जाऊ या जगताचा स्वार्थांचा बाजार ॥ ६ ॥
उकलुन दाऊ हृदये अपुली
छिन्न भिन्न जी जगती झाली
अवमानाने पोळुन गेली
फुंकर घालिल त्यावर मधुतर भिऊ नका म्हणणार ॥ ७ ॥
जहरि जगाला कंटाळोनी
आला धावत दूर श्रमोनी
बैसा बाळानो म्हणि वदुनी
घेइल अपुल्या कुशित आम्हा-मातृहृदय फुलणार ॥ ८ ॥
आनंदाश्रू येतिल नयनीं
हृदयाला ती हृदये मिळुनी
मुग्धतेत बघ गुंग होवुनी
विस्मरणे निज अस्तित्वाला स्वानंदे असणार ॥ ९ ॥
प्रेमलतेच्या छत्राखाली
काव्यानें जी हृदये भरली
पुष्पे त्यांची माला करुनी
घालु तियेच्या कंठी अभिनव काल तोच ठरणार ॥ १० ॥

## अनुष्टुभ्

परंतू आज विश्वात । राहोनी दूर अंतरी
श्रीपादसुत सप्रेमे । आस ती दर्शवी परी ।

१७-१-३८

---

# श्री. वा. शि. कोल्हटकर

'राष्ट्रीय कीर्तनकार'

यांचें

## – संग्राह्य वाङ्मय –

**कीर्तन-मंदाकिनी—** किंमत

| | |
|---|---|
| १ समर्थ जन्माख्यान, तरंग १ ला. | ०–४–० |
| २ छत्रपती शिवजन्माख्यान, तरंग २ रा. | ०–४–० |
| ३ लो. टिळक–जन्माख्यान, तरंग ३ रा. | ०–४–० |
| ४ विजापुरांत धेनुमुक्तता व सती पद्मिनी, तरंग ४ था. | ०–६–० |

**चैतन्य-ग्रंथमाला—**

| | |
|---|---|
| १ महाराणा–प्रताप, पुष्प १ लें | १–४–० |
| २ श्रीमत आद्यशंकराचार्य, ( ले. म. सी. जोशी ) पुष्प २ रें | ०–८–० |
| ३ सुलभ–कीर्तन–संग्रह, पुष्प ३ रें ( आवृत्ती २ री ) | ०–२–० |
| ४ रूपनगरची राजकुमारी, पुष्प ४ थें ( दुसरी आवृत्ती लौकरच प्रसिद्ध होईल. ) | ०–४–० |
| ५ राम–गीत–सुधा, पुष्प ५ वें | २–०–० |

प्रत्येकीं ट. ख. निराळा.

पत्ता:— **वासुदेव शिवराम कोल्हटकर**

१०५ पुरंदरे बाग, पुणे. २